महाराष्ट्र पोलीस
परित्राणाय सद्रक्षणाय

पोलीस उप आयुक्त वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

OW/DCP TRAFFIC THN/ADM/NOTIFICATION / २५ /2022 DATE 30/03/2022

## "वाहतूक नियंत्रण अधिसुचना"

**ज्याअर्थी**, ठाणे शहरामध्ये नौपाडा, वागळे, कापूरबावडी, कासारवडवली वाहतूक उपविभागाचे हद्दीत मोठ्या प्रमाणात गृहसंकुले उभारण्यात आली असून लोकसंख्या व वाहनांचे प्रमाणात वाढ झाली आहे. सदर परिसरातील नोकरदार वर्ग व उद्योगधंदे करणारे नागरिक दररोज सकाळी त्यांच्या वाहनांनी मुंबई, कल्याण, भिवंडी व नवी मुंबई कडे प्रवास करण्याचे प्रमाण जास्त आहे.

**ज्याअर्थी**, सध्या कोरोना विषाणु (कोव्हिड–१९) संसर्गामुळे आपत्कालीन परिस्थितील निर्माण झालेली असल्याने शरिरात रोग प्रतिकार शक्ती वाढावी व नियमित व्यायाम करावा, या उद्देशाने बहुसंख्य ज्येष्ठ नागरिक, महिला, लहान मुले दररोज सकाळी ०५:०० ते ०७:०० वा. दरम्यान मॉर्निंग वॉक करीता बाहेर पडत असतात. त्यावेळी सदर परिसरात टू व्हिलर, थ्री व्हिलर, फोर व्हिलर वरील वाहनचालक सकाळी भरधाव वेगाने वाहने चालवित असल्याने सदर परिसरातील मॉर्निंग वॉक चे ठिकाणी अपघात होवून जिवितहानी होवू नये तसेच सदर परिसरात वाहतूक कोंडी होवू नये व वाहतूक सुरळीत, सुनिश्चित होणे करीता नागरिकांच्या सोईसाठी,

**त्याअर्थी**, मी बाळासाहेब पाटील, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे:–

**प्रवेश बंद –** तीन हात नाका कडून उजवे बाजूच्या सर्व्हिस रोडने धर्मवीरनगर नाका कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना (पायी प्रवासी व सायकल वगळून) तीन हात नाका येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने तीन हात नाका येथून उजवीकडे वळण घेवून हरिनिवास मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** धर्मवीरनगर नाका सर्व्हिस रोडने तीन हात नाका कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना (पायी प्रवासी व सायकल वगळून) धर्मवीरनगर नाका येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने धर्मवीरनगर नाका येथून सरळ पूर्व द्रुतगती महामार्गाने इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** पायलादेवी मंदिर प्रवेशद्वार पासून उपवन ॲम्पीथिएटर कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना (पायी प्रवासी व सायकल वगळून) पायलादेवी मंदिर प्रवेशद्वार येथे डावीकडील मार्गिकेत **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने पायलादेवी मंदिर प्रवेशद्वार येथून उजव्या मार्गिकेतून ॲम्पीथिएटर कडे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** कोकणी पाडा, बिरसा मुंडा चौक कडून हिरानंदानी मेडोज, डॉ. काशिनाथ घाणेकर चौक कडे पवारनगर नवीन रोडच्या डावीकडील एका वाहिनीवरून जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना (पायी प्रवासी व सायकल वगळून) **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने बिरसा मुंडा चौक येथुन महाराजा अग्रसेन चौककडे जाणाऱ्या उजव्या मार्गिकेमधुन दुहेरी वाहतुकीने इच्छित स्थळी जातील.

सदरची अधिसुचना ही दि. ०१/०४/२०२२ रोजी पासून सकाळी ०५:३० ते ०८:०० वा. दरम्यान ३० दिवसांच्या प्रायोगिक तत्वावर लागू करण्यात येत असून कोणाची काहीएक हरकत असल्यास त्या लेखी स्वरूपात पोलीस उप आयुक्त कार्यालय, वाहतूक विभाग, तीन हात नाका, ठाणे ४००६०२ येथे पाठवाव्यात. याबाबत काही आक्षेप प्राप्त न झाल्यास सदरची अधिसुचना कायमस्वरूपी अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडॉर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागु राहणार नाही.

(बाळासाहेब पाटील)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

पोलीस उप आयुक्त,
आ.गु.शा. व [illegible], ठाणे
आवक क्रमांक : ४११
दिनांक : 30/3/2022

Scanned with CamScanner

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय ठाणे.

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

<u>प्रत माहितीसाठी सादर</u>

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

**प्रत कार्यवाहीकरीता :–**

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.

नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे.

परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, बृहन्मंबई व वसई–विरार महानगरपालिका.

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

प्रत :– <u>पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर</u>

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– <u>समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे</u>

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– <u>सपोआ वाहतूक विभाग, ठाणे, वागळे व पो.निरी. कासारवडवली, वागळे वाहतूक उप विभाग.</u>

२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावी.

Scanned with CamScanner